# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 14 October 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

मुंबईत प्रवेश करणाऱ्या पाचही मार्गांवरच्या टोल नाक्यांवर हलक्या मोटर वाहनांना संपूर्ण टोल माफी करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. आज रात्री बारा वाजल्यापासून या निर्णयाची अंमलबजावणी होणार आहे.

राज्यात प्रधानमंत्री आवास योजना शहरीचा दुसरा टप्पा राबवण्याचा निर्णयही मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

आगरी समाजासाठी महामंडळ स्थापन करणं, समाजकार्य महाविद्यालयांमधल्या अध्यापकांना करिअर ॲडव्हान्समेंट स्किम राबवणं, राज्य शेती महामंडळाची जमीन एमआयडीसीला हस्तांतरित करणं, मिरजच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात इमर्जन्सी मेडिसिनची तीन पदांची भरती, खंड क्षमापित झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करणं, किल्लारीच्या शेतकरी सहकारी कारखान्याला व्याजासह कर्जमाफी, तसंच अडचणीतल्या सहकारी उपसा जलसिंचन योजनांचं थकीत कर्ज माफ करण्यासही राज्य मंत्रिमंडळानं मान्यता दिली आहे.

दमणगंगा एकदरे गोदावरी नदी जोड योजना, आष्टी उपसा सिंचन योजनेसह, वैजापूरच्या शनीदेवगाव बंधाऱ्यास आणि पुणे मेट्रो रेल टप्पा-दोन मधल्या रेल्वे मार्गिकांच्या कामांना मान्यता मंत्रिमंडळानं मान्यता दिली आहे.

मराठी भाषेविषयक जनजागृतीसाठी पंधरवडा साजरा करणं, अण्णासाहेब जावळे मराठवाडा विकास मंडळासाठी तसंच उमेदसाठी अभ्यासगट स्थापन करणं आणि कौशल्य विद्यापीठाचं पद्मविभूषण रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ असं नामकरण करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

****

माजी राज्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या निधनाबद्दल मंत्रिमंडळ बैठकीत शोक व्यक्त करण्यात आला.
दरम्यान, बाबा सिद्दिकी यांच्या हत्येप्रकरणी अटकेत असलेल्या दोघांपैकी धर्मराज कश्यप हा आरोपी अल्पवयीन नसल्याचं चाचणीतून सिद्ध झालं आहे. त्यामुळे त्याला देखील २१ ऑक्टोबर पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

****

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज जालना जिल्हा दौऱ्यावर येणार असून, घनसावंगी तालुक्यातल्या कुंभार पिंपळगाव इथं शेतकरी मेळाव्याला ते संबोधित करणार आहेत. ब्ल्यू सफायर कंपनीच्या अन्नप्रक्रिया उद्योगाच्या दुसऱ्या युनिटचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन होणार आहे.

****

केंद्र सरकारने जम्मू काश्मीरमधली राष्ट्रपती राजवट उठवली असून, आता तिथे नवीन सरकार स्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे. केंद्र सरकारने यासंदर्भात अधिसूचना जारी केली आहे. नॅशनल कॉन्फरन्सचे उपाध्यक्ष ओमर अब्दुल्ला यांनी नवीन सरकार स्थापनेचा दावा केला आहे.

****

प्लास्टिक प्रदूषणावर मात करण्याच्यादृष्टीनं जैव प्लास्टिक उत्पादनाच्या जेजुरी इथल्या पथदर्शी प्रकल्पाचं केंद्रीय अणु ऊर्जा राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उद्घाटन झालं. जैव प्लास्टिक उत्पादनांमध्ये स्वदेशी तंत्रज्ञान विकसित करण्याचा हा प्रयत्न आहे.

****

भारताने जागतिक दर्जाची अंकेक्षित सार्वजनिक पायाभूत सुविधा विकसित केली आहे ज्यामुळे उच्च-गुणवत्तेची अंकेक्षित वित्तीय उत्पादनं विकसित करणं सुलभ झालं आहे असं मत रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी व्यक्त केलं आहे. ते आज नवी दिल्लीत RBI@90 या उच्चस्तरीय परिषदेत बोलत होते. एक लाख ४० हजार स्टार्टअप्स आणि शंभरहून अधिक युनिकॉर्नसह भारत आता जगात तिसऱ्या क्रमांकावर असल्याचं ते म्हणाले.

****

राज्यात रबी हंगामातल्या पिकांचं सरासरी क्षेत्र सुमारे ५४ लाख हेक्टर असून, गेल्या वर्षीच्या रबी हंगामापेक्षा यावर्षी सुमारे अडीच लाख हेक्टरनं अधिक म्हणजे ६१ लाख हेक्टरवर रब्बीचा पेरा होईल, असा अंदाज कृषी आयुक्तालयातले उपसंचालक

धनंजय कोंढाळकर यांनी व्यक्त केला आहे. राज्यात यावर्षी साडे १२ लाख क्विंटल बियाणं पुरवठ्याचं नियोजन असून, गरजेपेक्षा दोन लाख क्विंटल अतिरिक्त बियाणं उपलब्ध करुन देण्यात आलं आहे. आतापर्यंत ५४ हजार ७४० क्विंटल बियाणांचा पुरवठा करण्यात आला आहे, अशी माहिती कोंढाळकर यांनी दिली.

****

राज्यात राष्ट्रीय पोषण अभियानांतर्गत नांदेड जिल्ह्याने चार हजार १६४ अंगणवाड्यांमधून नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून, तब्बल ७४ लाख ४५ हजार ३४५ नोंदी घेत राज्यात दुसरा क्रमांक मिळवला आहे. पोषण माह अभियानात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या जिल्ह्यांचा काल मुंबईत गौरव करण्यात आला. कंधारचे बाल विकास प्रकल्प अधिकारी एल. एम. राजुरे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. अमरावती जिल्ह्यालाही विविध उपक्रम राबवून अव्वल स्थान मिळवल्याबद्दल राज्यस्तरीय दोन पुरस्कार मिळाले आहेत. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांनी ही माहिती दिली.

****

कोकण रेल्वेचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक संतोषकुमार झा यांनी आज रत्नागिरी रेल्वेस्थानकासमोरच्या श्रमशक्ती स्मारकाला पुष्पचक्र अर्पण करून दिवंगत कामगारांना आदरांजली वाहिली. कोकण रेल्वेमार्गाची उभारणी करताना अनेक कामगार, अभियंते आणि अधिकाऱ्यांना प्राण गमवावे लागले होते. त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ रत्नागिरी रेल्वेस्थानकासमोर श्रमशक्ती स्मारक उभारण्यात आलं असून, दर वर्षी १४ ऑक्टोबरला स्मृती दिवस पाळून त्यांना आदरांजली वाहिली जाते.

****